Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

लोकशाहीत युवकांची भूमिका

घुले जिजाभाऊ सिताराम
एम.ए.एम.फिल (राज्यशास्त्र) , मु.पो.पिंपळगांव रोठा, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

प्रस्तावना:

भारत देश हा एक प्राचीन संस्कृती व तरुण लोकशाही असलेला देश आहे. आपल्या देशाकडे एक सर्वोत्तम संपदा उपलब्ध आहे ती म्हणजे आपला बुध्दीमान युवा वर्ग, युवा पीढी ही कुठल्याही देशाची ऊर्जा असते. युवक जागृत असतील तर देश जागृत असतो व युवक निद्रीस्त असतील तर देश देखील निद्रीस्त असतो. इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला असे आढळून असे आढळून येईल □ी कुठल्याही देशाच्या क्रांतीच्या □द्रस्थानी युवकच असतात. युवक हे शक्ती,ऊर्जा,शौर्य,नविनता चिकाटी व उत्कटतेचे प्रतिक असतात. जगातील कोणतेही महत्वपूर्ण बदल युवकांमुळेच घडून येतात. भारताचा स्वातंत्र्य लढा असो, फेंच राज्यक्रांती, रशीयन राज्यक्रांती असो अथवा आपल्या शेजारच्या चीन मधील साम्यवादी क्रांती असो या सर्वामधील समा-न धा□ा म्ह□जे त्यातील युवकांचा मोठया प्रमाणात क्रियाशील संहभाग देश अथवा एखादा समाज, कुठल्याही सकारात्मक बदलासाठी युवकांकडे अपेक्षानपूर्ण नजर लावून बघत असतो. एखादया देशाची मजबूत इमारत ही तिचे भक्कम खांब म्हणजे युवक त्यांच्यावर खंबीरपणे पाय रोवून उभे असतात.

आपला भारत आज एक उदयनशील शक्तीकेंद्र म्हणून जगासमोर येत असताना भारतातील युवकांना महत्वपूर्ण भूमिका बजवावी लागणार आहे. देशात विविध प्रश्न नि-मा□ झाले दिसून येतात व त्यामुळे देशातील लोकशाहीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

देश आज आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत आहे व भारताची युवा पिढी हे त्याचे प्रमुख बलस्था-न आहे. राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात हया असामान्य ऊर्जेचा योगयप्रकारे वापर करण्यात आला पाहिजे. ही प्रचंड प्रतिभा विकसीत करण्यासाठी व तिचे संगोपन □रण्यासाठीचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे युवा शक्तीच्या नेत्यांवर लक्ष केंद्रीत करणे. आजचा भारत हा प्रगतीच्या पथावर अग्रेसर आहे ही गोष्ट निश्चितच आहे. परंतु त्याचवेळी भारताच्या विकासाचा वेग मंदावू शकणा-या □ाही गोष्टी घडत आहेत. गरीबी,बेरोजगारी, दहशतवाद, प्रांतवाद, जातीभेद, आरोग्य भ्रष्टाचार हया समस्या आज भारतीय लोकशाही समोर उभ्या आहेत. या समस्यांशी लढण्याचा एकमेव मार्ग म्हणजे प्रांत जात वर्ग व धर्म हयांच्या भिंती दूर सारुन देशातील युवकांनी एकत्र येणे. आपले राजकीय व सामाजिक जीवन जात-पात व प्रांतवादाकडे झुकत चालले आहे. तेव्हा आपल्या देशाला □रज भासत आहे, अशा काही युवकांची की जे संकुचित वृत्ती सोडून राष्ट्रीय एकात्मता व प्रगतीच्या दृष्टीने हया समस्यांचा सामना करतील. व भारतीय लोकशाहीत आपली महत्वपूर्ण भूमिका बजावून या देशातील लोकशाहीला अधिक भक्कम व दृढ करु शकतील. आपल्या देशाच्या वर्तमान राजकरणात असे अनेक राष्ट्रीय नेते आहेत की ज्यांनी विदयार्थी दशेतच राजकीय प्रवासाला सुरुवात केली. लोकशाही कार्यपध्दतीची माहिती घेवून आपली हक्क आणि कर्तव्ये व अधिकार यांची जाण होवून एक संपूर्ण नागरीक निर्माण होण्याची आता गरज निर्माण झाली आहे व त्यासाठी युवकांची भारतीय लोकशाहीतील भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे.

लोकशाही व भारत :

लोकशाही राज्यव्यवस्थेची कल्पना फार प्राचिन □ाळापासून चालत आलेली आहे. तथापी लोकशाही □ल्पनेचा विकास गेल्या दोन तीन शतकातच झालेला आढळून येतो. प्राचिन कालाखंडात ग्रीक,रोम व भारत या

ठिकाणी गणराज्यांचे अस्तित्व होते. ग्रीक नगर राज्यांनी तर लोकशाहीच्या मुर्त व तत्वज्ञानी स्वरुपांचा विचार केला. भारतात स्वायत्त टोळया होत्या. त्यांचा कसारभार लोकशाही तत्वानुसार चालत असे. लोकशाहीचा मुळ गाभ सार्वभौम सत्ता प्रजेच्या हाती असणे. भारतात रुढ होते. भारत आज जगातील सर्वात मोठा लोकशाही शासन व्यवस्था असलेला देश आहे.

लो□शाही सं□ल्प-ा :

इंग्रजीतील Demoeracy या शब्दाचे मराठीत लोकशाही असे भाषांतर केले जाते. इंग्रजीतील डेमो केसी हा शब्द मुळ ग्रीक शब्द आहे. Demos म्हणजे लोक आणि cratos म्हणजे सत्ता याचा अर्थ लोकांची सत्ता असा होतो. अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या सुप्रसिध्द आहे. लोकांचे लोकांसाठी लोंकांनी चालवलेले शासन म्हणजे लो□शाही होय (Government of the people for the people & by the people). ब्राइस याच्या मते लोकशाही म्हणजे शासन पध्दतीचा असा प्रकार की ज्यामध्ये राज्यावर राज्य करण्याची कायदेशीर सत्ता, समाजातील वर्गापैकी एखादया विशिष्ठ वर्गाच्या ठिकाणी नसते तर, समाजातील सर्व लोकांच्यामध्ये ती वसत असते (The form of Government in which the ruling power of state is legelly vested not in any particular classes but in the members of community as a whole). मात्र राज्यकारभारत निव्वळ लोकांची मान्यता पुरेशी नाही तर खरी लोकशाही प्रस्तापित होण्यासाठी लोक जागरुक हवेत. लोकशाहीत लोकांची राज्यकारभारला मिळणारी मान्यता ही □ारी सा□य सह□ार्य दे□ारी व परि□ाम□ार□ हवी तरच खरी लोकशाही प्रस्तापीत होवु शकेल. प्रो.सिली यांनी प्रत्येक व्यक्तीचा ज्यामध्ये भाग आहे अशी शासनपध्दती म्हणजे लोकशाही होय असे म्हटले आहे (A Government in which every one has share).

आज भारतातील शासनव्यवस्था लोकशाहीच्या या संकल्पनांनुसार असलेली दिसून येते. लोकशाही केवळ बहुमतानुसार चालविता येत नाही ते घटनेनुसार आणि कायदयानुसारही चालवावी लागते. आज भारतीय राज्यक्षटना ज□ातील सर्वात मोठी राज्यघटना असुन कायदयानुसार राज्य चालवले जात आहे.

लोकशाही शासनपध्दती यशस्वी होण्यासाठी लोकशाही समाज निर्माण व्हावयास हवा. कारण निव्वळ लोकशाही यंत्र□ा निर्मा□ □रु-ा लोकशाही निर्माण होत नाही. कारण निवडणूका, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, इत्यादी गोष्टी या तांत्रिक स्वरुपाच्या आहेत. केवळ निवडणूका घेतल्या म्हणजे लोकशाही साकार होत नाही किंवा निव्वळ यंत्र□ा उभी □ल्याने प्रगती होत नाही. लोकशाहीसाठी लोकशाही यंत्रणेबरोबरच लोकशाही समाजही हवा. आज भारत आणि पाकिस्तान ही दोन्ही लोकशाही राष्ट्र म्हणुन उदयास आली. मात्र भारतात जशी लोकशाही रुजली तशी पाकिस्तानात रुजू शकली नाही. कारण तेथे लोकशाही समाज निर्माण झालेला नाही. तसेच पहिल्या व दुस-या महायुध्दानंतर आशिया व आफ्रिका □ंडातील कित्येक राज्ये स्वतंत्र झाली प्रारंभी तेथे लोकशाही शासनपध्दती स्थापन झाली पण तेथे लोकशाही टिकली नाही याचे कारण तेथे लोकशाही समाज निर्माण झाला नाही. आज भारतात लोकशाही यशस्वी होण्याचे कारण म्हणजे लोकशाही मुल्यांवर विश्वास ठेवणारा समाज निर्माण झाला आहे. मात्र आज भारतीय लोकशाहीसमोर विविध समस्या आव्हान म्हणून उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही भवितव्यासमोर प्रश्न निर्माण झाले आहेत.

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने :-

ब्रिटीशांचे राज्य या देशावर असतांना, स्वातंत्र्यांचे ध्येय साकार करण्यासाठी हा संबंध देश एकात्म झाला होता. पण ते ध्येय पदरात पडल्यानंतर मात्र या देशात अनेक संकुचित अस्मिता वर उसळून आल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय जनतेस जी राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना होती ती भावना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राहीली नाही त्यामुळे भारतीय लोकशाहीसमोर मोठया प्रमाणावर समस्या निर्मा□ झालेल्या आहेत.धर्म, जातिसंस्था, भाषा, प्रांतीयता, गरीबी व दारिद्रय, फुटीरतावादी चळवळी इ. लोकशाही मुल्यांना व राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.

धर्माचे राजकारण :-

धर्म □ारे पाहता समाजाला एकत्र धरुन ठेवण्याचे कार्य करतो पण या देशाचा मात्र अनुभव उलटा आहे. इथे धर्म संघटनापेक्षा विघटनात्मक शक्ती म्हणून कार्य करतांना आढळतो.एकदा धर्मांधतेच्या राजकारणामुळे देशाचे दोन तुकडे झाले तरी त्यापासून हा देश फारसे काही शिकल्याचे आढळत नाही. आज या धर्मांधतेच्या पोटी संकुचित सांप्रादायिकता जुनाट, बुरसटलेली व प्रतिगामी मनोवृत्ती सर्वच धर्मांच्या कट्टर उपासकांमध्ये इथे आढळून येते. सहिष्णुतेची भावना येथे फारच अल्प प्रमाणात आढळते. भारत हे धर्मांधिष्ठीत राष्ट्र नसुन धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. स्वतंत्र भारताने स्वत:साठी धर्मनिरपेक्ष संविधानाची निवड केली आहे. मात्र आज धर्मांचा राजकरणासाठी वापर केला जात आहे. जमातवादी राजकारण येथे निर्मा□ झाले आहे या जमात वादयांच्या या राजकाणाने लोकशाहीसमोर मोठी समस्या निर्माण केली आहे. तसेच राष्ट्रीय एकात्मतेला अडसर निर्माण झाला आहे.

जातीयतेची समस्या :-

भारतात धर्माच्या आधारे तट तटबंदया आहेतच पण त्याचबरोबर प्रत्येक धर्माच्या अनुयायांमध्ये या देशात अनेक जाती, उपजाती आहेत आणि या जाती, उपजाती आपापसात स्पर्धा,कलह,संघर्ष करीत असतात. भारतीय समाजाची घडण लोकशाही प्रणीत समतेवर करण्याआड ही जातीयता प्रामुख्याने येते. अलीकडच्या काळात काही वर्षात जातीची चर्चा अनेक संदर्भात विशेष प्रकर्षाने केली जाते. निवडणूका, नोक-या, आरक्षण, मलिदा वाटप अशा अनेक विषयांची चर्चा जातीचा उल्लेखांशिवाय पुर्ण होत नाही. भारतात व्यक्तींच्या व समुहांच्या आयुष्यात जन्म, मृत्यू, विवाह सणात्सव, इतर धार्मिक सामाजिक विधी एवढेच नव्हे तर उपजीविका व सामाजीक नियंत्रण अशा अनेकाविध संदर्भात जातीला महत्व असल्याने राजकिय क्षेत्रात तिला मध्यवर्ती स्थान मिळाले. भारतीय राजकारणाला जातीयेतची किड लागलेली आहे. आज देशात सर्वत्र वरचढ जातींचे राजकारण सुरु आहे. जात ही संस्था पुर्णपणे अधिसत्ताक असून लोकशाही विरोधी आहे. निवडणूकांमध्ये जातीच्या सबबीवर मते मागणा-यांची संख्या मोठी असल्याचे दिसून येते. त्यातून जातीव्यवस्था भक्कम होण्यास मदत होते.

भाषावाद :-

संप्रषणाचे माध्यम म्हणून भाषेचा उगम होत असला तरी तिचे महत्व केवळ साधन मात्र नसते. विशिष्ट भाषा होत्या त्या समाजाच्या संस्कृतीची वाहक ठरते व भाषिक अस्मिता निर्माण होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आजपर्यंत भाषेचा प्रश्न सुटलेला नाही. हिंदी राष्ट्रभाषा मानली असली तरी दक्षिणेकडील राज्ये हिंदी भाषेला प्रखर विरोध करतांना दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासून चाललेला हा भाषावाद अजुन संपलेला नाही. प्रत्येक घटक राज्याची भाषा ही वेगवेगळी असून प्रत्येकाला आपल्या भाषेचा अभिमान आहे. आज प्रोदशिक भाषाभिमा-न निर्मा□ झाला आहे.

प्रादेशिकतेचे आव्हान :-

आज देशात प्रादेशिक अस्मीता अधुनमधून डोके वर काढत आहेत. विकासाच्या प्रादेशिक असमतोलामुळेच काही प्रादेशिक घटक वेगवेगळया राज्याची मागणी □रतांना दिसतात. महाराष्ट्रातील वेगळया विदर्भ राज्याची मागणी तसेच तेलंगणाची मागणीही याची काही उदाहरणे आहेत. मी भारतीय याएवजी मी महाराष्ट्रीयन, मी कन्नड, मी तामिळ, मी □ुजराथी, मी पंजाबी, वगैरे बाबत अभिमान मनात असलेला दिसून येतो तसेच विकासाच्या असमतोलामुळे भारतातील घटकराज्यांची विभागणी विकसीत राज्ये व मागास राज्ये अशी झालेली दिसून येते. अप्रगत राज्यांत दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचा आकारही प्रगत राज्यांपेक्षा प्रचंड मोठा आहे. स्वाभाविकच ओरिसा, बिहार, त्रिपुरा, मि□पूर, आसाम या अप्रगत राज्यांमध्ये असंतोष धुमसत आहे.

फुटीरतावादी चळवळी :-

प्रादेशिक हितसबंधाना धरुन उभ्या राहीलेल्या प्रत्येक चळवळीला फुटीरतावादी व राष्ट्र द्रोही ठरवण्याचा प्रयत्न □धी कधी केला जातो. स्वातंत्र्यानंतर अनेक भागात फुटीरतावादी चळवळी निर्माण झाल्या होत्या. पण त्यांना सत्तेत योग्य वाटा मिळाल्यानंतर त्या शांत झाल्या मात्र आजही जम्मू काश्मिरमध्ये फुटीरतावादी चळवळी असलेल्या आपणांस दिसून येतात.

दारिद्रय / आर्थिक विषमता :-

आज भारतीय समाज पूर्वी कधीच नव्हता एवढा दोन वर्गात विभक्त झाला असून त्यातील अंतर सतत वाढत आहे. एक वर्ग बहुसंख्य गरीबांचा व शोषित वंचितांचा असुन दुसरा वर्ग विकासाने लाभान्वीत झालेल्या सुखवस्तु लोकांचा आहे. टोकाचे दारिद्रय आणि टोकाची श्रीमंती या दोन्ही गोष्टी लोकशाहीला सारख्याच मारक असतात. अर्धपोटी, अर्ध-□ा व अशिक्षित राहुनही माणसांनी उच्च कोटीची राष्ट्रभक्ती, राष्ट्राचा सन्मान, लोकशाही मुल्यांची जोपासणा करावी ही अपेक्षा जशी अनाठायी आहे तशीच पैशात लोळणारी आणि अधिक पैशासाठी वाटेल ते करणारी माणसेही राष्ट्रनिष्ठ असण्याची शक्यता कमीच असते. वाममार्गाने कमवलेला पैसा व राष्ट्रनिष्ठा हया एकत्र नांदु शकत नाहीत. राजकारणी आपल्याला लुबाडतात फसवतात अशी जनसामान्यांची धारणा झालेली आहे त्यामुळे राष्ट्रउभारणीत नागरीकांचा जो क्रियाशील रचनात्मक सहभाग आवश्यक असतो तो ते देऊ शकत नाहीत. मायकेल हॅरिंग्टन यांच्या मते भारतात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन यांपासून वंचित असणारा ४० टक्के समाज आहे. भारतात ४० □ोटी लोक दरिद्री आहेत की, ज्यांना अन्न, वस्त्र, निवारा, अशा किमान गरजांची पुर्तता योग्य पध्दतीने करता येत नाही. लोकसंख्या वाढल्याने भारतीय

समाज अधिक दरिद्री बनत चालला आहे. भारतात दरडोई उत्पन्न घटले आहे. वाढती महागाई बेसुमार भाववाढ यामुळे किमान गरजा भागविणे अशक्य झाले.

भ्रष्टाचार :-

भ्रष्टाचार भारतीय राजकारणात कर्करोगापेक्षाही झपाटयाने प्रसार झाला असुन रोज नविन क्षेत्रात भ्रष्टाचाराची प्रकरण बाहेर येताना दिसतात. निवडणूकांच्या राजकरणापासून लष्करासाठी लागणा-या सामग्रीच्या खरेदीपर्यंत व शहीद जवानांच्या कुटुंबियांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकापर्यंत सर्व व्यवहार भ्रष्टाचाराच्या सावटाखाली आले आहेत. अनेक प□ांच्या जेष्ठ नेत्यांच्या व मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची मोठमोठाल्या रक्कमांची प्रकरणे वेशिवर टांगली गेली असून त्यात जणु उच्चांक गाठण्याची स्पर्धाच लागलेली आहे. यशस्वी होण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब □म्य ठरतो. हे बाजारपेठी सुत्र आजच्या राज्यकारभाराचे मार्गदर्शक तत्व असून संविधानातील मार्गदर्शक तत्वे अडगळीत पडली आहेत.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण :-

आज निवडणुकांमध्ये मोठया प्रमाणावर पैसा खर्च केला जातो. त्यासाठी काळया पैशाचे निवडणूक प्रक्रियेतील प्रस्थ वाढले आहे. स्टीफन कोचानेक यांनी भारतीय राजकारणाचे वर्णन ब्रीफकेस पॉलिटीक्स असे केले होते. त्यानंतर ब्रीफकेसची जागा सुटकेसने घेतली. पुढे पेटी, खोका या भाषेतच आर्थिक व्यवहार केले जाऊ लागले. निवडणुक प्रक्रियेत वाढलेला हिंसाचार हा सुध्दा गुन्हेगारांना राजकारणात उजळमाथ्याने वावरण्याची संधी देण्यास कारणीभूत झाला आहे. शांततामय पध्दतीने सत्तांतर घडवून आणण्याचा मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पडणा-या निवडणुकांचे वर्णन केले जाते. प्रत्यक्षात मात्र उमेदवार पळवणे, ठार मारणे, मतदारांना धाक दाखवणे, डांबुन ठेवणे, हुल्लडबाजी करुन प्रचार अशक्य करणे, मतदान केंद्र बळकावणे, बोगस मतदान करणे, मतपेटया पळवणे, इ. प्रमाण वाढत चालले आहे. राजकारण हा अनेकांचा पुर्णवेळ व्यवसाय बनला आहे. सत्तेचे राजकारण खेळणारे नेते विरोधकाला संपवण्यासाठी भाडोत्री □ुडांना हाताशी धरतात. राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकारण सुरु झाल्यामुळे ते अधिक आत्मविश्वासपूर्वक राजकारणात वावरतात.

भारतीय लोकशाहीत युवकांची भूमिका :-

संपूर्ण देशभरातील राज्यकारभाराचे निराशाजनक चित्र असले तरी आशेला मुळीच काही जागा नाही असे म्हणता ये□ार -ाही या काळयाकुटट ढगांच्या काही रुपेरी कडाही आहेत. देशाला या परिस्थितीतुन बाहेर काढुन लो□शाहीला प्रगल्भ बनवण्याचे काम, युवक करु शकतात म्हणून भारतीय लोकशाहीत युवकांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या पहिल्या पिढीने लोकशाहीच्या यशासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. लोकशाही संस्थांबद्दल आदारभाव, लोकशाही संकेत व पायंडे यांचे भान आणि लोकशाही कार्यपध्दतीवर आग्रह याकडे पाहिल्यास पहिल्या पिढीने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. मात्र नंतरची पिढी या सर्व गोष्टी सोयीस्करपणे विसरली त्यामुळे लोकशाही समोर आज आव्हान निर्माण झाले आहे. मात्र या सर्व परिस्थितीशी मुकाबला करण्याची क्षमता आजच्या युवकांमध्ये आहे. आज ६० % लोकसंख्या युवा वर्गाची आहे. या युवकांनी योग्य भूमिका बजावणे आता काळाची गरज आहे. त्यासाठी पुढीलप्रकारे भुमिका बजावता येईल.

सामाजिक समतेसाठी प्रयत्न :-

युवकांनी सक्रिय राजकारणात भाग घेतल्यानंतर सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामाजिक समता म्हणजे नागरीकांत कोणताही भेदभाव नसणे. वर्ग, जात, पंथ, धर्म, लिंग, स्थान यावरुन नागरीकांत □ोणताही भेदभाव होणार नाही याची काळजी घेणे. लोकशाहीत विशिष्ठ वर्गांना खास सवलती दिल्यास बंधुभावाच्या भावनेला तडे जातात व समाजाच्या ए□ात्मतेला बाधा पोहचते. भारतीय संविधानाने दिलेल्या दर्जा व संधीची समानता प्राप्त □शी करता येईल यासाठी प्रामाणीकपणे प्रयत्न करावा.

सक्रीय राजकारणात प्रवेश :-

आज भारतीय राजकारणातील अविश्वासाचे वातावरण असल्यामुळे जो तो राजकारण्यांवर टिका करुन मोकळे होतो मात्र युवकांनी आता केवळ टिका न करता प्रत्यक्ष राजकारणात सहभागी झाले पाहीजे. “नेता बनो या नेता चुनो” अशी भूमिका घेतली पाहीजे. लोकशाहीतील राबविण्याच्या प्रक्रियेत व वारंवार सहभागी होवुनच प्राप्त होते. याचा विचार □रणे आवश्यक आहे. युवकांनी राजकारणाबाबत उदासीन राहणे उपयोगाचे नाही कारण निर्णयप्रक्रिया राजकीय नेते घेत असतात. सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी प्रयत्न भारतीय लोकशाहीत महत्वाची भूमिका पार पाडत असतांना युव□ां-ी

समाजाच्या शेवटच्या गरजा लक्षात घेवून तेथील राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण वगैरे बाबतचा निर्णय घेतांना □ांधीजींच्या सत्ता विकेंद्रीकरणाच्या तत्वाचा अंगीकार करुन आदर्श ग्रामस्वराज्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षणातून सामाजिक परिवर्तन घडून येण्याच्या दृष्टीने त्यात काय काय फेरफार करणे आवश्यक आहेत याबाबत विचार करणे.



धर्मनिरपेक्षता तत्वांचा अंगीकार :-

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. संवीधानाने सर्व धर्मांना समान मानले आहे. त्यामुळे धर्मांच्या नावावर राजकारण □र□ा-या राजकारण्यांना युवकांनी साथ देवू नये. सामान्य जनतेच्या मनात धर्माधिष्ठीत राजकारणाऐवजी विकासाच्या राजकारणाचा दृष्टीकोन कसा निर्माण होईल यासाठी जागृतीची आवश्यकता आहे. युवकांनी हि भूमिका बजावणे आवश्यक आहे.

सार्वजनिक जबाबदारीची जाणिव :-

लोकशाहीमध्ये राजकारभार हा अधिकाधिक लोकाभिमुख होत जातो. व राज्याचे कार्यक्षेत्र वाढत जाते. अशावेळी सरकारी मालमत्तेची नासधूस करणे, अपहार करणे किंवा त्याविषयी बेजबाबदार बनने या गोष्टी लो□शाहीला हानि□ार□ आहेत. "जाऊ दया" आपल्याला काय करावयाचे त्याच्याशी ? होईल सरकारचे नुकसान ! पाहुन घेईल सरकार !! हि वृत्ती सोडून दिली पाहिजे. सार्वजनिक जबाबदारीची जाणीव निर्माण करुन त्यानुसार आचरण युवकानी केले पाहिजे. बघे वृत्ती उपयोगाची नाही. सरकार कोणीतरी परके आहे. नाईलाज म्हणून आम्ही कायदे पाळतो, कर भरतो अशा त-हेची वृत्ती लोकाशाहीस घातक आहे याची जाणीव युवकांनी ठेवणे आवश्यक.

धर्म व जाती विरहीत राजकारण :-

भारतात व्यक्तींच्या व समुहाच्या आयुष्यात जातीला महत्व असल्यामुळे राजकीय क्षेत्रात तिला मध्यवर्ती स्था-न मिळाले तसेच राजकीय पुढा-यां-ी धार्मिक भावना भडकुन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला व जात धर्मयुक्त राजकारण या देशात सुरु झाले. युवकांनी सक्रिय राजकारणात येतांना जात धर्म आपापल्या घरात ठेवुन आम्ही सर्वजन फक्त भारतीय आहोत हा विचार घेवुन काम केले पाहिजे. जात व धर्म यांना जीवंत ठेवणारी दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शाळा, महाविदयालये, वसतीगृहे, आरोग्य केंद्रे, शिरगणती, विविध उदयोगधंदे, संस्था, संघटना कचे-यांत जातींची व धर्माची नोंद होते ती थांबवण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. शिक्षणाव्दारे व प्रचार माध्यमांव्दारे जनतेला सुशिक्षित, सुजाण बनविली पाहिजे. सुशिक्षीत,सुसंस्कृत जनता राष्ट्रीय एकात्मतेचे अंतिम उदिद्ष्ठ साध्य करुन लोकशाही प्रस्थापीत व यशस्वी □रु शकते. जातीयतेचा अडसर दुर करण्यासाठी शासन, राजकीय व सामाजीक कार्यकर्ते यांच्या बरोबर काम □रु-ा युवकांनी जबाबदारीने व जाणीवेने जाती निर्मुलनाचे कार्य सातत्याने केले पाहिजे.

भाषिक अस्मीता :-

आज भाषिक विविधता, भाषिक निष्ठा आणि भाषिक अस्मीतांसाठी उग्र लढे लढण्याची तयारी या तिन्ही दृष्टीं-ी भारतीय राजकारणाला भाषा या घटकाने प्रभावित केले आहे. मात्र भारतासारख्या पुर्वापार बहुभाषिक असलेल्या राष्ट्राची एकच राष्ट्रभाषा असणे शक्य नाही व आवश्यकही नाही हे सर्वप्रथम लक्षात घ्यायला हवे. हा देश नेहमीच बहुभाषिक होता आणि तरीही विविध भागांतील व्यक्तींचे संप्रेषणही निर्वेधपणे घडत होते. तेव्हा भाषिक विविधता आ□ एकेका भाषेचे प्रांतिक पातळीवर झालेले सिमांकन या भारताच्या भाषिक रचनेच्या वैशिष्टयांचे भान युवकांनी ठेवूनच इथल्या भाषिक अस्मीतांचा राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. अमुक एक भाषा श्रेष्ठ किंवा असे न मानता इतर भाषांचे ज्ञा-न अवगत करण्याचा प्रयत्न करणे.

आर्थिक विषमता नष्ट करणे :-

आर्थिक विषमतेमुळे आज भारतीय समाज पुर्वी कधीच नव्हता एवढा दोन वर्गात विभक्त झाला असुन त्यातील अंतर सतत वाढत आहे. या गोष्टी लोकशाही व्यवस्थेला मारक आहेत. देशातील राजकीय जीवन निरोगी उदारमतवादी व सुनीतीपुर्ण होण्यावरही लोकशाहीचे भवितव्य अवलंबुन आहे. त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न □रणे आवश्यक आहे. आपण सर्वजण भारतीय आहोत. ही भावना निर्माण होणे आज गरजेचे आहे. आपल्या देशाने समाजवादाचे उदिष्ठ स्वीकारलेले आहे. समाजवादाचे उदिष्ठ साध्य होण्याच्या दृष्टीने जाणीवपुर्वक प्रयत्न करणे आवश्यक.ग्रामिण भारत व शहरी इंडिया यातील दरी दुर करण्यासाठी म. गांधीनी सांगितलेल्या खेडयांकडे चला या विचारांचा अंगीकार करणे आज आवश्यक आहे. आजही मोठया प्रमाणावर जनता ग्रामीण भागात राहते याचाच अर्थ ६० □ोटी तरु□ांपै□ी ६० % तरुण खेडयात राहतात. त्यामुळे ग्रामिण भारताचा विकास करण्यासाठी युवकांनी पुढे येणे आवश्यक आहे. प्रत्येकजण शहराकडे धाव घ्यायला लागल्यास ग्रामिण भारताच्या विकासाचा प्रश्न उभा राहिल म्ह□ू-न □ामीण भागातून तरुणांनी शहराकडे धाव न घेता ग्रामिण भागातच व्यवसाय सुरु करण्याचा व परिसराचा विकास करण्याचा संकल्प केला पाहीजे. तेव्हाच आर्थिक समता प्रस्तापीत होण्यास मदत होईल.

चारित्र्य संवर्ध-न :-

भ्रष्टाचाराची मोठी समस्या आज देशासमोर उभी राहिली आहे. जेव्हा सेवा सकंल्प बनते तर आदर्श नागरी□ास निर्माण करते. मात्र सेवा जर मजबुरी बनली तर ती भ्रष्टाचारी नागरीक निर्माण करते. त्यासाठी चारित्र्य संवर्धन करणे आवश्यक आहे. युवकांनी चारित्र्य जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चारित्र्य शुध्द असणे हे ऐक्य भावनेसाठी अत्यावश्यक असते. राज्यकर्ते आपल्याला लुबाडतात,फसवतात अशी झालेली जनतेची धारणा बदलण्यासाठी युवकांनी राजकारणात येतांना स्वार्थ व भ्रष्ट कृत्यांना तिलांजली दिली पाहिजे.

माहितीचा अधिकार कायदयाचा उपयोग करुन युवकांनी ज्या ज्या ठिकाणी भ्रष्टाचार होत आहे. त्या त्या ठिकाणची माहिती घेवून भ्रष्टाचार उघड केला पाहिजे. आज या कायदयाचा युवकांकडून होणारा वापर लक्षणिय आहे ही निश्चितच समाधानाची गोष्ट आहे. देशातील भ्रष्टाचार जर पुर्णपणे थांबवण्यात आप□ यशस्वी झालो तर देश जागतीक महासत्ता होण्यास आणि गत वैभव प्राप्त करण्यास फार वेळ लागणार नाही. यासाठी युवकांनी संकल्पीत होणे आज आवश्यक आहे. सत्ता आणि जनता यांच्यातील अंतर जेव्हा नष्ट होईल तेव्हा भ्रष्टाचार संपुष्टात येईल कारण केंद्रीकरण जेवढे जास्त तेवढे जनता व निर्णय केंद्र यांच्यातील अंतर जास्त होते आणि भ्रष्टाचाराला रान मोकळे होते. त्यामुळे सत्तेचे ख-या अर्थाने वि□द्री□र□ होणे आणि लोकांच्या हाती येणे हाच भ्रष्टाचाराला प्रभावी आळा घालण्याचा मार्ग आहे. तसेच भ्रष्टाचाराविरोधात युवकांनी समाजजागृती केली पाहीजे कारण समाजातुन दडपण आल्यावर प्रशासनाला पारदर्श□ होण्याखेरीज पर्याय उरणार नाही.

समारोप :-

लोकशाही देशात युवक हा महत्वाचा व जबाबदार घटक आहे. युवकांच्या ठिकाणी लोकशाही पेलण्याचे सामर्थ्य निर्माण होणे आवश्यक आहे व त्यासाठी गुणवत्ता सिध्द करण्याची आवश्यकता आहे. आज सुदैवाने भारतीय लोकशाही समोर असणारी आव्हाने पेलण्यास भारतीय युवकांकडे क्षमता आहे. त्यांनी आपली क्षमता लक्षात घेवून आव्हानांचा विचार □ल्यास व आपल्यातील सुयोग्य नेतृत्व क्षमता विकसीत केल्यास देशासमोरील आव्हाने ते सहज सोडवू शकतील सारांश भारतीय लोकशाहीत युवकांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

संदर्भ :-

१) पां. श्री. घारे, राज्यशास्त्र - पु□ विदयार्थी □ृह प्र□ाश-ा १९७२
2) य. दी. फडके, आजकालचे राजकारणी, २०००.
३) भा. ल. भोळे, भारताचे स्वातंत्र्य : पन्नास वर्षाचा मागोवा, १९९८
४) भा. ल. भोळे, राजकीय भारत - १९७८
५) बाळ प्रकाश व किशोर बेडकिहाळ, भारतीय राजकीय व्यवस्था, २००१
6) बाळ प्रकाश व किशोर बेडकिहाळ, धर्म आणि राजकारण विपर्यास आणि वस्तुस्थिती.
7) भा. ल. भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - 2003.
8) पी. बी. पाटील, भारतीय शासन आणि राजकारण 2003.
9) पहला भारतीय छात्र संसद, 2011.
10) www.google.wikipedia.com